(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

रिट याचिका क्र. ५७/१९७९

न्यायनिर्णय दिनांक : १२/०२/१९७९

अपीलकर्ते : **हुसैनआरा खातून आणि इतर**

विरुद्ध

उत्तरवादी : **गृह सचिव , बिहार राज्य शासन , पाटणा**

माननीय न्यायमूर्ती/ न्यायमंच :

न्या. ए. डी. कोशल, पी. एन. भगवती आणि आर. एस. पाठक

वकिल :

वकिल : के. हिंगोरानी - अपीलकर्ते / याचिकाकर्ते/ वादी यांचे करिता

वकील : एस. एम. झा आणि पी. पी. सिंग - उत्तरवादी/ प्रतिवादी यांचे करिता

न्यायनिर्णय

न्या. पी. एन. भगवती

१. हेबियस कॉर्पसच्या रिटसाठीची ही याचिका बिहार राज्यातील न्यायदानाच्या संदर्भातील धक्कादायक स्थिती उघड करते.तुरुंगात असलेले पुरुष, स्त्रिया आणि मुले सुद्धा अनेक वर्षे कायद्याच्या न्यायालयात न्यायचौकशीच्या प्रतिक्षेत, चिंताजनकरीत्या मोठ्या संख्येने आहेत. त्यातील काही जणांवर/ जणींवर ज्या गुन्ह्यांचा आरोप आहे ते आरोप क्षुल्लक आहेत आणि ते सिद्ध जरी झाले तरी काही महिन्यांपेक्षा जास्त, कदाचित एक - दोन वर्षांपर्यंत शिक्षा होऊ शकत नाही आणि तरीही, हे मानवता विसरलेले दुर्दैवी

नमुने त्यांच्या खटल्यांची न्यायचौकशी सुद्धा सुरू न होता सुमारे तीन ते दहा वर्षे इतक्या कालावधीपासून तुरुंगात आहेत आणि त्यांच्या स्वातंत्र्यापासून वंचित आहेत.इतक्या मोठ्या संख्येने स्त्री-पुरुषांना खटला न चालवता, इतक्या मोठ्या कालावधीसाठी तुरुंगवासात ठेवणे ही बाब न्यायव्यवस्थेसाठी लाजिरवाणी गोष्ट आहे. आम्ही मानवी हक्कांचे संरक्षण व त्यांच्या अंमलबजावणीसाठी जाहीरपणे व विस्ताराने आमची भूमिका मांडत आहोत. मूलभूत स्वातंत्र्याची परिरक्षा आणि जतन याबाबत आम्ही पोटतिडकीने आणि परिणामकारकरित्या बोलत आहोत. परंतु, असे गुन्हे, जे कदाचित त्यांनी शेवटी केलेलेच नाहीत, अशा गुन्ह्यांसाठी वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडलेल्या अशा या निनावी व्यक्तींना आपण मानवी हक्क देण्याचे नाकारत नाही आहोत का? वर्षानुवर्षे तुरुंगवासाची आणि अधोगतीची शिक्षा भोगणाऱ्या या उपेक्षित आणि असहाय्य मानवांचे मूलभूत स्वातंत्र्य आपण रोखत नाही आहोत का? जलदगतीने खटल्याची सुनावणी आणि अटकेपासून स्वातंत्र्य ह्या बाबी मूलभूत स्वातंत्र्याचा भाग नाहीयेत का? यातील अनेक दुर्दैवी पुरुष आणि महिलांना आठवतही नसेल की ते कारागृहात कधी आणि कोणत्या गुन्ह्यांसाठी गेले होते? गेल्या कित्येक वर्षांपासून ते मनुष्यप्राणी म्हणून जगायचे विसरून गेले आहेत आणि आता ते निव्वळ कैदी नंबर म्हणून उरले आहेत.आता हिच वेळ आहे की, आम जनतेची सदसदविवेकबुद्धी जागृत झाली आहे आणि सरकारला व न्यायव्यवस्थेला हे जाणवू लागले आहे की आपल्या कारागृहांच्या अंधाऱ्या कोठडीत मोठ्या संख्येने स्त्री पुरुष आहेत, जे धीराने, अधीरतेने न्याय - या एकाच बाबीची वाट बघत आहेत पण, ते व्यर्थ आहे आणि ते करुणास्पदरीतीने त्यांच्या आवाक्याबाहेरचे व आकलना बाहेरचे आहे.कायदा हे त्यांच्यासाठी अन्यायाचे साधन बनले आहे. ते असहाय्य आणि नाऊमेद आहेत व ते कायदे व न्यायिक व्यवस्थेच्या कठोरतेचे बळी ठरले आहेत.अशी वेळ आली आहे की कायदेशीर व न्यायिक व्यवस्थेची पुनर्रचना करणे आवश्यक आहे. जेणेकरून असे अन्याय होऊ नयेत आणि आपल्या नुकत्याच अस्तित्वात आलेल्या लोकशाहीचा न्याय्य आणि उजळ चेहरा विद्रूप होऊ नये.

२. आम्ही बिहार राज्य शासनास दोन आठवड्यांपूर्वी नोटीस जारी केली असली तरीही, दुर्दैवाची बाब ही की ५ फेब्रुवारी, १९७९ रोजी सदर राज्यशासनाच्या वतीने कोणीही हजर झाले नाही आणि त्यामुळे या टप्प्यावर, आम्हाला, इंडियन एक्सप्रेसच्या दिनांक ८ व ९ जानेवारी १९७९ च्या अंकांमध्ये करण्यात आलेले आरोप, जे नंतर रिट याचिकेच्या मुद्द्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले, ते बरोबर आहेत, या बाबीच्या आधारावर पुढे जाणे आवश्यक आहे.सदर वर्तमानपत्राच्या कात्रणांमध्ये नमूद असलेली माहिती ही अत्यंत क्लेशदायक आहे आणि ती विवेकबुद्धीला हलवून टाकण्यासाठी व कोणत्याही सामाजिकदृष्ट्या प्रेरित वकील किंवा न्यायाधीशाची मन:शांती बिघडवण्यासाठी पुरेशी आहे. काही न्यायाधीन बंदी ज्यांची नावे वृत्तपत्रांच्या कात्रणांमध्ये नमूद केलेली आहेत ते तब्बल ५, ७ किंवा ९ वर्षे आणि त्यांच्यापैकी काही तर अगदी १० वर्षांपासून अधिक काळ तुरुंगात आहेत आणि तेही त्यांच्या प्रकरणात न्यायचौकशी सुद्धा सुरू न होता.या हरवलेल्या गुमनाम व्यक्तींचा न्यायव्यवस्थेवर काय विश्वास असू शकतो जी त्यांच्यासाठी इतकी वर्षे न्यायचौकशी सुद्धा नाकारते आणि त्यांना तुरुंगात खितपत ठेवते आणि हे सगळे, ते दोषी आहेत म्हणून नव्हे तर त्यांना जामीन मिळवणे परवडू शकत नाही आणि न्यायालयांना त्यांच्या प्रकरणांमध्ये न्यायचौकशी करण्यासाठी वेळ नाही म्हणून ही न्यायाची थट्टाच आहे की अनेक गरीब आरोपींना, काही भारतीयांना जबरदस्तीने तुरुंगात परतंत्रतेत राहावे लागते कारण जामीनप्रक्रिया त्यांच्या तुटपुंज उत्पन्नाच्या साधनांच्या आवाक्याबाहेर असते आणि न्यायचौकशी सुरू देखील होत नाहीत आणि जरी सुरू झाल्या तरी त्या कधीही निष्कर्षाप्रती पोहोचत नाहीत. मनेका गांधी विरुद्ध भारतीय संघराज्य (म. नु./ एस. सी./ ०१३३/ १९७८ : [१९७८] २ एस. सी. आर. ६२१ या प्रकरणात, प्रस्तुत न्यायालय यांनी मांडलेली अनुच्छेद २१ ची प्रभावी अर्थउकल की, सदर अनुच्छेदाच्या आवश्यकतेशी सुसंगत राहण्यासाठी, न्यायचौकशीविना इतक्या मोठ्या संख्येने स्त्री-पुरुषांना प्रदीर्घ काळ तुरुंगात ठेवणारी प्रक्रिया, वाजवी, न्याय्य किंवा प्रामाणिक मानली जाऊ शकत

नाही आणि म्हणूनच विधिमंडळाने लागू केलेला आणि न्यायालयांद्वारे प्रशासित केलेल्या कायद्याचा, खटलापूर्व स्थानबद्धता याबाबतचा दृष्टिकोन आमुलाग्र बदलणे आहे आणि वाजवी, न्याय्य आणि प्रामाणिक प्रक्रिया सुनिश्चित करणे अत्यावश्यक आहे, ज्यास मनेका गांधी (उपरोल्लेखित) प्रकरणानंतर सर्जनशील मतितार्थ आहे.

३. आता, आपली कायदेशीर आणि न्यायिक प्रक्रिया न्यायचौकशीपूर्व स्थानबद्धतेत गरिबांना सातत्याने प्रदीर्घ काळासाठी ठेवून त्यांना न्याय नाकारत आहे आणि याचे कारण म्हणजे आपली अत्यंत असमाधानकारक जामीन प्रक्रिया ही मालमत्ता केंद्रित दृष्टिकोनाने बाधित आहे आणि आर्थिक नुकसानीचा धोका न्यायापासून पलायन करण्यासाठी एकमेव अडचण आहे, या चुकीच्या गृहीतकावर पुढे जात आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता देखील तिच्या पुन:अधिनियमानंतरही मागील शतकाच्या अखेरीस लागू केलेल्या पूर्वीच्या संहितेप्रमाणेच तोच कालबाह्य दृष्टिकोन, सातत्याने अंगीकारित आहे. जिथे एखाद्या आरोपीला त्याच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडले जाईल तेव्हा, सदर संहिता, सदर जातमुचलक्यात आर्थिक बंधन असावे ज्यामध्ये आरोपीने जर तो न्यायचौकशीसाठी अनुपस्थित राहिला तर त्या प्रकरणात ठराविक रक्कम भरावी असा आग्रह धरते. याशिवाय, गरिबांना जणू काही हे पुरेसे नव्हते म्हणून न्यायालये, यांत्रिकरित्या आणि प्रक्रियेचा भाग म्हणून आरोपीने त्याच्यासाठी जामीन राहील असा जामीनदार हजर करण्यास आदेशित करतात आणि या जामीनदारांनी देखील जर सदर आरोपी त्याच्यावरील आरोपास उत्तर देण्यास अनुपस्थित राहिल्यास, ते सदर जामिनाची रक्कम भरण्यास सक्षम आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्यांची सदर रक्कम भरण्याची क्षमता सिद्ध करावी लागते. जामिनाची ही प्रक्रिया गरीब लोकांच्या विरोधात अत्यंत कठोरपणे कार्य करते आणि केवळ गैर-गरीब लोकच याचा फायदा घेत त्यांची जामीनावर सुटका करून घेतात. गरीब लोकांना जामीनदाराशिवाय जामीन मिळवणे देखील कठीण जाते कारण बऱ्याचदा न्यायालयांनी निश्चित केलेली जामिनाची रक्कम इतकी अवास्तविकपणे जास्त असते की अशा बहुतांश प्रकरणांमध्ये गरीब आरोपी, जामिनाच्या रकमेसंदर्भात

त्यांच्या ऐपतीबाबत पोलीस किंवा न्यायदंडाधिकारी यांचे समाधान करू शकत नाहीत आणि ज्या प्रकरणांमध्ये जामीनासोबत जामीनदार देण्यास आदेशिले जाते, त्या प्रकरणात गरीब आरोपींना, त्यांच्यासाठी जामीनदार म्हणून उभा राहण्यास पुरेसा ऐपतदार आहे, असा व्यक्ती शोधण्यास अत्यंत कठीण होऊन बसते. याचा परिणाम असा होतो की, एकतर ते पोलीस आणि महसुली अधिकारी किंवा दलाल आणि धंदेवाईक जामीनदार यांच्याकडून लुबाडले जातात आणि काही वेळेस त्यांना स्वतःची सुटका करून घेण्यासाठी कर्जही घ्यावी लागतात किंवा अशा रीतीने सुटका न मिळाल्यामुळे, त्यांना न्यायालये त्यांचे खटले न्यायचौकशीसाठी पटलावर घेत नाहीत तोपर्यंत, तुरुंगातच राहावे लागते. ज्यामुळे, त्यांना गंभीर दुष्परिणाम भोगावे लागतात जसे की १] जरी ते निर्दोष आहेत असे जरी मानले तरी त्यांना तुरुंगातील वास्तव्यात मानसिक आणि शारीरिक त्रासाला तोंड द्यावे लागते, २] त्यांना त्यांचा बचाव तयार करण्यामध्ये त्यांचे योगदान देण्यापासून रोखले जाते आणि ३] त्यांना, त्यांची नोकरी, असेल तर, गमवावी लागते ज्यामुळे त्यांना स्वतःचा आणि कुटुंबीयांचा उदारनिर्वाह चालविण्याच्या संधीपासून पारखे व्हावे लागते. परिणामी, त्यांचा अटकेचा भार जवळजवळ नेहमीच त्यांच्या निर्दोष कुटुंबियांवर पडतो. येथे गरिबांना आपली कायदेशीर आणि न्यायव्यवस्था अन्यायकारक आणि त्यांच्या विरोधात दबावाची वाटते आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये वैफल्य आणि नैराश्याची भावना निर्माण होते कारण त्यांच्या असे लक्षात येते की गैर-गरीब लोकांच्या सोबत ते असमानतेच्या स्थितीत असहाय्य अवस्थेत उभे आहेत. गुजरात सरकारने श्रीमान न्यायमूर्ती भगवती यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या कायदेशीर सेवा समितीने या अत्यंत विषम अशा असमानतेवर खालील शब्दांत भर दिला.

> जामीन प्रणाली, जी आज आपण न्यायालयांमध्ये प्रशासित असलेली पाहतो, ती अत्यंत असमाधानकारक आहे आणि त्यात आमुलाग्र बदल आवश्यक आहेत. प्रथमतः आरोपीच्या

> अनुपस्थितीच्या जोखमीचे तंतोतंत आर्थिक अटींमध्ये रूपांतरण अक्षरशः अशक्य आहे आणि आरोपीला पळून जाण्यापासून रोखण्यासाठी आर्थिक नुकसान होण्याची जोखीम आवश्यक आहे हा मूळ आधार संशयास्पद वैधतेचा आहे. अशा अनेक बाबी आहेत ज्या आरोपीस न्यायापासून पळून जाण्यापासून परावृत्त करतात आणि आर्थिक नुकसानीची जोखीम त्यापैकी फक्त एक आहे आणि ती देखील खूप मोठी नाही. युनायटेड स्टेट्स मधील अज्ञान दूर करणारी जामीन प्रोजेक्ट जसे की मॅनहॅटन जामीन प्रोजेक्ट आणि डी. सी जामीन प्रोजेक्ट यांचा अनुभव दर्शवतो की आर्थिक जामीन नसतानाही मोठ्या संख्येने असलेल्या खटल्यांमधील न्यायचौकशीच्या वेळेस आरोपीची उपस्थिती सुनिश्चित करणे शक्य झाले आहे. त्याशिवाय, जामीन पद्धतीमुळे गरिबांविरुद्ध भेदभाव निर्माण होतो कारण श्रीमंत व्यक्ती अन्यथा अशाच परिस्थितीत त्यांचे स्वातंत्र्य सुरक्षित करू शकतील कारण त्यांना जामीन देणे परवडते. दंडाधिकाऱ्यांनी ठरवून दिलेल्या जामीनाची रक्कम जास्त नसली तरीही हा भेदभाव उद्भवतो कारण फौजदारी खटल्यांमध्ये ज्यांना न्यायालयासमोर हजर केले जाते त्यापैकी बहुसंख्य लोक इतके गरीब असतात की त्यांना त्यामुळे लहान रकमेचाही जामीन देणे फार कठीण जाते.

आरोपीची वैयक्तिक आर्थिक परिस्थिती आणि खटल्यापूर्वी पळून जाण्याची शक्यता यांसारख्या संबंधित घटकांचा विचार न करता, निश्चित केलेल्या आरोपांच्या संदर्भात जामीन रक्कम निश्चित करण्याची प्रथा कशी कठोर, अत्याचारी आणि गरिबांप्रती भेदभाव

निर्माण करणारी आहे याकडेही गुजरात समितीने लक्ष वेधले.

जामीन प्रणालीचे भेदभावपूर्ण स्वरूप हे ज्या यांत्रिक पद्धतीने चालविले जाते त्या कारणास्तव ती अधिकच तीव्र होत जाते. सैद्धांतिकदृष्ट्या न्यायदंडाधिकाऱ्यांना जामिनाची रक्कम निश्चित करण्याची स्वेच्छानिर्णयाचा व्यापक अधिकार असतो हे खरे असले तरीही, प्रत्यक्ष व्यवहारात असे दिसून येते की, जामिनाची रक्कम नेहमीच गुन्ह्याच्या गांभीर्यावर अवलंबून असते आणि ती गुन्ह्यामधील आरोपांच्या संदर्भातील अनुसूचीनुसार निश्चित केली जाते. एकतर, आरोपी त्याच्या खटल्यातील न्यायचौकशीपूर्वी पळून जाण्याचा प्रयत्न करेल या संभाव्यतेला किंवा त्याच्या वैयक्तिक आर्थिक परिस्थितीला थोडे महत्त्व दिले जाते आणि जर जामिनाचा उद्देश खटल्यातील न्यायचौकशीच्या वेळी आरोपीच्या हजेरीची खात्री करणे हा असेल तर वरील घटक सर्वात सुसंगत वाटणारे घटक आहेत. या घटकांकडे दुर्लक्ष करून आणि केवळ गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन जामिनाची रक्कम यांत्रिकरित्या सुनिश्चित करणे म्हणजे जामीन देण्याच्या क्षमतेच्या बाबतीत श्रीमंतांसारख्या आर्थिक स्थितीत नसलेल्या गरिबांशी भेदभाव करणे होय. न्यायालये, गरीब आणि श्रीमंत आरोपींच्या जामीन देण्याच्या विभिन्न क्षमतेकडे दुर्लक्ष करून आणि त्यांना समान वागणूक देऊन, श्रीमंत आणि गरीब आरोपी यांच्यात असमानता निर्माण करतात. श्रीमंत आरोपी ज्याच्यावर एकाच समान परिस्थितीतील समान गुन्ह्याचा आरोप आहे तो त्याची सुटका सुनिश्चित करू शकतो तर गरीब आरोपी त्याच्या गरिबीमुळे असे करू शकत नाही. आज प्रशासित केल्या जाणाऱ्या जामीन

प्रक्रियेमध्ये या काही प्रमुख त्रुटी आहेत.

बेल रिफॉर्म्स ऍक्ट, १९६६ वर स्वाक्षरी करताना, राष्ट्राध्यक्ष लिंडन बी जॉन्सन यांनी हिच व्यथा व्यक्त केली होती; आणि

> आज, आम्ही आमच्या गुन्हेगारी प्रकरणातील न्यायप्रणालीमध्ये महत्त्वाचा बदल सुनिश्चित करण्यासाठी एकत्र येत आहोत; जामीन प्रणालीमध्ये सुधारणा.
>
> १७८९ च्या न्यायिक कायद्यापासून ही प्रणाली टिकून आहे, जी पुरातन, अन्यायकारक आणि अक्षरशः न तपासलेली अशी आहे.
>
> जामिनाचा मुख्य उद्देश म्हणजे आरोपी व्यक्ती अटकेनंतर (जामीनावर) सोडल्यास तो न्यायचौकशीसाठी परत येईल याची खात्री करणे.
>
> सध्याच्या व्यवस्थेत तो उद्देश कसा पूर्ण होतो? ज्याच्याकडे जामीन देण्यासाठी साधन आहे अशा प्रतिवादीला जामीन रक्कम भरणे परवडू शकते आणि त्याला त्याचे स्वातंत्र्य विकत घेणे परवडते. परंतु, गरीब प्रतिवादी ही किंमत देऊ शकत नाही. तो त्याच्या प्रकरणात न्यायचौकशी सुरू होण्याआधी आठवडे, महिने आणि कदाचित अनेक वर्षे तुरुंगात खितपत पडतो.
>
> तो दोषी आहे म्हणून तुरुंगात राहत नाही.
>
> कोणतीही शिक्षा त्याच्यावर लादली म्हणून तो तुरुंगात राहत नाही.
>
> तो तुरुंगात यासाठी राहत नाही की तो न्यायचौकशी पूर्वी पळून जाण्याची शक्यता आहे.
>
> तो फक्त एका कारणासाठी तुरुंगात राहतो कारण, तो गरीब आहे.

जामीनप्रणाली, ज्याप्रमाणे ती आज कार्यरत आहे, ती गरिबांसाठी खूप त्रासदायक आहे आणि जर आपण खरोखरच गरिबीचे वाईट परिणाम दूर करू इच्छित असाल आणि न्यायदान प्रक्रियेत गरिबांना न्याय्य आणि प्रामाणिकपणाच्या वागणुकीची खात्री देण्याची इच्छा असेल तर यासाठी जामीन पद्धतीमध्ये अमुलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे, जेणेकरून गरिबांना श्रीमंत आरोपींप्रमाणेच, न्यायाचे हित धोक्यात न आणता न्यायचौकशीपूर्वी सुटका करून घेणे शक्य व्हावे.

४. आता अशी वेळ आली आहे की आपल्या संसदेने हे लक्षात घेतले पाहिजे की, आर्थिक नुकसानीचा धोका हा न्यायापासून पळून जाण्यापासून रोखण्याचा एकमेव प्रतिबंधक घटक नाही तर इतरही घटक आहेत जे पळून जाण्यापासून समान प्रतिबंधक म्हणून काम करतात. सामाजिक न्याय अशी ओळख असलेले संविधान असलेले हे आपले समाजवादी प्रजासत्ताक आहे आणि संसदेने आपल्या संविधानाच्या गुणवैशिष्ट्यांशी अधिक मिळत्याजुळत्या इतर संबंधित बाबी जसे की, आर्थिक नुकसान होण्याच्या जोखमीऐवजी, कौटुंबिक संबंध, समाजातील मुळे, नोकरीची सुरक्षितता, स्थिर संस्थांचे सदस्यत्व इत्यादी बाबी या जामीन देण्याचे निर्णायक घटक असावेत, असे विचारात घ्यावे आणि योग्य प्रकरणांमध्ये, आरोपीला आर्थिक बंधनाशिवाय, त्याच्या वैयक्तिक बंधपत्रावर सोडण्यात यावे. अर्थातच, अशा प्रकरणात, दंडात्मक कायद्यातील दुरुस्तीद्वारे अशी दुरुस्ती करणे आवश्यक असू शकते की जर आरोपी न्यायचौकशीसाठी अनुपस्थित राहून त्याच्या वैयक्तिक बंधपत्रांमध्ये दिलेल्या वचनाचे पालन करण्यास अपयशी ठरल्यास तो दंडात्मक कारवाईस पात्र असेल. परंतु, आताच्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसारही न्यायालयांनी कालबाह्य संकल्पना, ज्या अंतर्गत केवळ जामीनदारासह जामीन देण्यासापेक्ष न्यायचौकशीपूर्व सुटकेचे आदेश दिले जातात, सोडून देणे आवश्यक आहे. सदर संकल्पना कालबाह्य आहे आणि अनुभवाने असे दाखवून दिले आहे की त्यामुळे चांगल्या बाबींपेक्षा जास्त नुकसानच केले आहे. न्यायचौकशीपूर्वक सुटकेच्या संदर्भातील नवीन अंतर्दृष्टी जी सामाजिकदृष्ट्या प्रगत

देशांमध्ये विकसित केली गेली आहे आणि विशेषतः युनायटेड स्टेट्सने न्यायचौकशीपूर्व सुटकेबाबतच्या आपल्या न्यायालयांच्या न्यायनिर्णयांची माहिती दिली पाहिजे. आरोपीची मुळे समाजात रुजली आहेत आणि त्यामुळे तो फरार होण्याची शक्यता नाही हे न्यायालयासमोर मांडलेल्या माहितीच्या आधारे लक्षात घेतल्यानंतर न्यायालयाचे समाधान झाल्यास, न्यायालय आरोपीला त्याच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडू शकते. आरोपीस पळून जाण्यापासून परावृत्त करण्यासाठी सदर आरोपीची मुळे समाजात रुजली आहेत किंवा नाहीत हे ठरवण्यासाठी, न्यायालयांनी खाली नमूद संबंधित बाबी विचारात घेतल्या पाहिजेत.

१. समाजामधील त्याच्या वास्तव्याचा कालावधी.

२. त्याच्या नोकरीची स्थिती, पूर्वेतिहास आणि त्याची आर्थिक स्थिती.

३. त्याचे कौटुंबिक बंध आणि नातेसंबंध.

४. त्याची प्रतिष्ठा, चारित्र्य आणि आर्थिक स्थिती.

५. त्याचा गुन्हेगारी पूर्वेतिहास यासह पूर्वी जातमुचलक्यावर किंवा जामीनावर सुटका झाल्याबाबतचा अभिलेख.

६. समाजातील जबाबदार सदस्यांनी दिलेली आरोपीची ओळख जी त्याच्या विश्वासार्हतेबाबत खात्री देईल.

७. आरोपीने केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप आणि दोषसिद्धी होण्याची भावी संभाव्यता आणि ज्याप्रकारे हे घटक अनुपस्थितीबाबतच्या धोक्याबाबतीत संबंधित आहेत, त्याप्रकारे संभाव्य शिक्षा आणि

८. आरोपीचे समाजाशी असलेले संबंध किंवा जाणीवपूर्वक अनुपस्थित राहण्याचा धोका दर्शवणारे अन्य कोणतेही घटक.

आरोपीचे समाजाशी असलेले संबंध आणि त्याच्या अनुपस्थितीबाबत कोणताही मोठा धोका नाही या संबंधित घटकांचा विचार केल्यानंतर न्यायालयाचे समाधान झाल्यास आरोपीला, शक्यतो, त्याची स्थिती आणि पार्श्वभूमी लक्षात घेऊन त्याचा पूर्वेतिहास, गुन्ह्याचे स्वरूप आणि परिस्थिती लक्षात घेऊन, जर तथ्ये न्यायालयाच्या निदर्शनास आणली गेली तर त्याला वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडले जाऊ शकते. परंतु, इथेही त्याच्या न्यायचौकशीसाठी अनुपस्थितीबाबतचा एक मोठा धोका संभवतो. जसा की, जर आरोपी एक वाईट चारित्र्याचा कुख्यात गुन्हेगार आहे किंवा सिद्धदोषी गुन्हेगार आहे किंवा सदर गुन्हा गंभीर आहे (ही उदाहरणे केवळ स्पष्टीकरणादाखल दिली आहेत.) तर, न्यायालय आरोपीस वैयक्तिक जातमुचलक्यावर सोड ू शकत नाही आणि जामीनदारासह जामिनाचा आदेश देऊ शकते. परंतु, बहुतांश प्रकरणांमध्ये कौटुंबिक संबंध आणि नातेसंबंध, समाजामध्ये रुजलेली मुळे, नोकरीची स्थिती इत्यादीचा विचार, आरोपीला त्याच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडताना न्यायालये करत असतात आणि विशेषतः ज्या प्रकरणांमध्ये गुन्हा गंभीर नसतो आणि आरोपी गरीब किंवा समाजातील दुर्बल घटकांमधील असतो, तेव्हा सदर आरोपीस वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडण्यास शक्य तितके प्राधान्य दिले जाऊ शकते. परंतु, वैयक्तिक जातमुचलक्यावर आरोपीस सोडताना न्यायालयास सावध करणे आवश्यक आहे की, न्यायालय निश्चित करेल ती जातमुचलक्याची रक्कम केवळ आरोपाच्या स्वरूपावर अवलंबून नसावी. जातमुचलक्याच्या रकमेबाबतचा निर्णय हा आरोपीच्या वैयक्तिक आर्थिक परिस्थितीवर आणि त्याच्या फरारी होण्याची शक्यता यावर अवलंबून असून वैयक्तिक स्तरावरील असावा. जातमुचलक्याची रक्कम या संबंधित घटकांचा विचार करून सुनिश्चित केली जावी आणि ती आरोपाच्या स्वरूपाशी संबंधित अनुसूचीनुसार यांत्रिकपणे निश्चित केली जाऊ नये. अन्यथा, वैयक्तिक जातमुचलका देऊनही सदर आरोपीस त्याची सुटका करून घेणे अवघड होईल. शिवाय, जेव्हा आरोपीस पुन्हा त्याच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडले जाते तेव्हा त्याला पुन्हा न्यायालयाचे

समाधान होईल अशी बाब सादर करणे खूपच कठीण आणि जाचक असेल. आम्ही येथे न्यायालयांच्या संदर्भात जे काही नमूद केले आहे ते पोलिसांच्या संदर्भातही जामीन लागू करताना समानपणे लागू झाले पाहिजे की आरोपीने न्यायचौकशीच्या वेळेस अनुपस्थितीत राहिल्यास आणि त्याचा जातमुचलका जप्त झाल्यास तो जातमुचलक्याची रक्कम भरण्यास सक्षम आहे याचा विचार झाला पाहिजे. आरोपीच्या रक्कम भरण्यास सक्षम असण्याबाबतची चौकशी, त्याच्यासाठी मोठ्या छळाचे कारण बनू शकते आणि त्याची परिणती त्यास जामीन नाकारण्यात आणि त्यास सुटकेपासून वंचित ठेवण्यात होते आणि म्हणून वैयक्तिक जातमुचलका स्वीकारण्याच्या अटीचा आग्रह धरला जाऊ नये. आम्ही प्रस्तुत न्यायनिर्णयामध्ये नमूद केलेल्या पद्धतीने सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार जर जामीनप्रणाली राबविण्यात आली तर ती गरिबांच्या अडीअडचणी दूर करण्यास आणि त्यांना तुरुंगवासातून मुक्त होण्यास मदत करण्यास प्रदीर्घ काळापर्यंत मदत होईल यात आम्हाला अजिबात शंका नाही. या कारणास्तव आम्ही, असे न्यायाधीन बंदी ज्यांची नावे इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्राच्या वर नमूद दोन अंकांमध्ये नमूद केली आहेत, त्यांची त्यांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर ताबडतोब सुटका करण्याचे निर्देश दिले आहेत. आम्ही सामान्यतः असे म्हणावयास हवे होते की, त्यांच्याद्वारे निष्पादीत करावयाचे वैयक्तिक जातमुचलके आर्थिक दायित्वासहीत असावेत. परंतु, आम्ही अपवादात्मक उपाय म्हणून वैयक्तिक जातमुचलक्यांसोबत कोणतेही आर्थिक दायित्व लादले जाऊ नये असे निर्देश दिले कारण आम्हाला असे आढळले की या सर्व व्यक्ती कोणत्याही न्यायचौकशीविना अनेक वर्षे तुरुंगात आहेत आणि तेही अशा गुन्ह्यांसाठी की ज्यांची शिक्षा स्थानबद्धतेच्या कालावधीपेक्षाही कमी दिवसांची असेल आणि त्याशिवाय आम्ही पारित करत असलेला आदेश हा केवळ अंतरिम आदेश होता. या प्रकरणातील असाधारण तत्वे आणि परिस्थितीने असा नेहमीपेक्षा निराळा मार्ग ठरवला.

५. कायदेशीर आणि न्यायिक व्यवस्थेची आणखी एक कमजोरी अशी आहे जी न्यायाधीन बंद्यांना सरसकटपणे न्याय नाकारण्यास जबाबदार आहे आणि ती म्हणजे खटले निकामी काढण्यात अक्षम्य विलंब. एखाद्या आरोपीचा खटला वर्षानुवर्षे सुरूही होऊ नये हे कायदेशीर आणि न्यायिक व्यवस्थेचे दुःखद प्रतिबिंब आहे. न्यायचौकशी सुरू होण्यास एका वर्षाचा विलंब होणे ही बाब देखील खूपच वाईट आहे, मग असा विलंब जर ३ किंवा ५ किंवा ७ किंवा १० वर्षांपर्यंत लांबला असेल तर ती बाब किती वाईट असू शकते. जलदगतीने न्यायचौकशी ही फौजदारी न्यायाचे सार आहे आणि त्यामुळे न्यायचौकशीला उशीर होणे म्हणजे न्याय नाकारणे होय यात शंका नाही. येथे हे लक्षात घेणे रोचक आहे की युनायटेड स्टेट्समधील जलदगतीने न्यायचौकशी हा घटनात्मक हमी दिलेल्या अधिकारांपैकी एक अधिकार आहे. घटनेच्या सहाव्या दुरुस्तीमध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की,

> सर्व फौजदारी खटल्यांमध्ये आरोपींना जलदगतीने आणि सरकारी न्यायचौकशीचा हक्क मिळेल.

तसेच युरोपियन कराराच्या मानवी हक्कासंबंधात अनुच्छेद ३ अंतर्गत अशी तरतूद आहे की,

> अटक केलेल्या किंवा स्थानबद्धतेतील प्रत्येक व्यक्तीस त्याच्या प्रकरणात योग्य कालावधीच्या आत न्यायचौकशी होण्याचा किंवा न्यायचौकशी सुरु असताना त्यास सोडण्याचा हक्क असेल.

आम्हाला असे वाटते की, आपल्या संविधानानुसार प्रकरणात जलदगतीने न्यायचौकशी हा मूलभूत अधिकार म्हणून गणला जात नसेल तरीही मनेका गांधी विरुद्ध भारतीय संघराज्य म. नु/ एस. सी/ ०१३३/ १९७८ : [१९७८] २ एस. सी. आर ६२१ या प्रकरणामध्ये या न्यायालयाने स्पष्ट केल्यानुसार कलम २१ चा व्यापक आवाका आणि आशय निर्विवाद आहे. आम्ही त्या प्रकरणात असे मानले आहे की, अनुच्छेद २१ प्रत्येक

व्यक्तीला कायद्याने विहित केलेल्या प्रक्रियेशिवाय त्याला त्याच्या जीवनापासून किंवा स्वातंत्र्यापासून वंचित न ठेवण्याचा मूलभूत अधिकार प्रदान करतो आणि सदर अनुच्छेदाच्या आवश्यकतांचे पालन करण्यासाठी हे पुरेसे नाही की एखाद्या प्रक्रियेचे साम्य कायद्याने विहित केलेले असावे. परंतु, ती प्रक्रिया वाजवी, न्याय्य आणि प्रामाणिक असावी. एखाद्या व्यक्तीला जर वाजवी, न्याय्य आणि प्रामाणिक नसलेल्या प्रक्रियेअंतर्गत त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले जात असेल तर अशी वंचितता अनुच्छेद २१ अन्वये त्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करणारी असेल आणि त्याला अशा मूलभूत अधिकाराची अंमलबजावणी करण्याचा आणि त्याची सुटका सुरक्षित ठेवण्याचा हक्क असेल. आता, सहाजिकच एखाद्या व्यक्तीचे स्वातंत्र्य हिरावून घेण्यासाठी कायद्याने विहित केलेली प्रक्रिया, जोपर्यंत ती प्रक्रिया अशा व्यक्तीच्या अपराधाच्या निर्धारणासाठी जलदगतीने न्यायचौकशीची हमी देत नाही तोपर्यंत, वाजवी, न्याय्य किंवा प्रामाणिक असू शकत नाही. वाजवीपणे जलद न्यायचौकशीची खात्री न देणारी कोणतीही प्रक्रिया वाजवी, न्याय्य किंवा प्रामाणिक मानली जाऊ शकत नाही आणि ती अनुच्छेद २१ प्रमाणे चुकीची ठरेल. त्यामुळे जलद न्यायचौकशी आणि जलद न्यायचौकशी म्हणजे आमच्या मते वाजवीरित्या जलद न्यायचौकशी ही अनुच्छेद २१ मध्ये नमूद केल्यानुसार जगण्याच्या आणि स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्काचा अविभाज्य आणि आवश्यक भाग आहे, यात शंकाच नाही. परंतु प्रश्न असा उद्भवतो की, जर एखादा अपराध केल्याचा आरोप असलेल्या व्यक्तीस जलदगतीने न्यायचौकशी नाकारली गेली आणि अनुच्छेद २१ अन्वये त्यास मिळालेल्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करून प्रदीर्घकाळ चाललेल्या न्यायचौकशीच्या परिणामी तुरुंगातच ठेऊन त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले, याचा परिणाम काय असेल? त्यास विनाकारण प्रदीर्घ काळाच्या उशिरानंतर त्यास अशा उशिराच्या न्यायचौकशीनंतर शिक्षा देणे या कारणास्तव त्याच्यावर करण्यात आलेल्या आरोपांमधून बिनशर्त मुक्त होण्याचा हक्क आहे का आणि यामुळे अनुच्छेद २१ अन्वये त्यास मिळालेल्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन

होईल का? त्यामुळे आम्हाला, प्रकरणातील तहकुब केलेल्या तारखेला रिट याचिकेवर गुणवत्तेवर आधारित सुनावणी करताना हा प्रश्न विचारात घ्यावा लागेल. परंतु, एक गोष्ट निश्चित आहे आणि आपण ती राज्य शासनावर जोरदारपणे ठसवू शकत नाही की, न्यायप्रशासनाच्या बाबतीत राज्य शासनाने जनतेप्रती आपली जबाबदारी ओळखून न्यायचौकशीसाठी अधिकाधिक न्यायालये स्थापन करण्याची वेळ आली आहे. आम्ही असे निदर्शनास आणू शकतो की, जर राज्य शासनाला न्याय प्रशासनाची व्यवस्था सुधारायची असेल आणि ज्यांच्यासाठी आज न्याय हा अर्थहीन आणि पोकळ शब्द आहे त्यांच्यासाठी न्याय मिळवून देणारे साधन बनवायचे असेल तर अधिकाधिक न्यायालये स्थापन करणे केवळ पुरेसे नाही तर राज्य शासनाला सक्षम न्यायाधीशांद्वारे त्याचे व्यवस्थापन करावे लागेल आणि सक्षम न्यायाधीशांची नियुक्ती करण्याच्या उद्देशाने जी पावले उचलणे जरुरीचे आहे जसे की त्यांच्या सेवाशर्तींमध्ये सुधारणा करणे, ती राज्य सरकारला उचलावी लागतील.

६. ही कारणे आहेत ज्यासाठी आम्ही आमचा आदेश दिनांक ५ फेब्रुवारी, १९७९ रोजी दिला. आता आम्ही १९ फेब्रुवारी, १९७९ रोजी रिट याचिकेमध्ये सुनावणी घेऊ.

न्यायमूर्ती आर. एस. पाठक :

७. हे निर्विवाद आहे की, न्यायचौकशी सुरू करण्याआधी, न्यायाधीन बंद्यांना अनावश्यकपणे दीर्घकाळ तुरुंगात स्थानबध्दतेमध्ये ठेवणे हे मानवी स्वातंत्र्याच्या सर्व सुसंस्कृत नियमांचे उल्लंघन आहे. व्यक्ती स्वातंत्र्याची कोणतीही अर्थपूर्ण संकल्पना जी सुसंस्कृत कायदेशीर व्यवस्थेचा पाया बनवते, तिला न्यायचौकशीच्या प्रतीक्षेत असलेल्या व्यक्तींना न्यायप्रशासनाचे लक्ष वेधून घेण्यापूर्वी प्रदीर्घकाळ तुरुंगवास भोगावा लागतो या बाबी सोबत बघितले पाहिजे. गुन्हेगारी कायद्याचे प्राथमिक तत्व असे आहे की, दोषी ठरवल्यानंतर तुरुंगवास होऊ शकतो परंतु त्यापूर्वी तो होऊ नये. परंतु आणखी एक असे तत्त्व आहे की जे, आरोपी दोषी आहे असे सिद्ध झाल्यास त्या अपराधाची शिक्षा

भोगण्यासाठी आरोपी उपस्थित असल्याची खात्री करणे इष्ट ठरवते. आता फौजदारी प्रक्रिया संहिता, जुनी आणि नवीन अशा दोन्ही संहिता, एखाद्या व्यक्तीस जामिनावर सोडण्याची किंवा त्याच्या उपस्थितीसाठी जामीन न घेता किंवा जामीनदाराशिवाय जातमुचलका निष्पादित करण्यासाठी तरतूद समाविष्ट करते. परंतु, असे असले तरी, आमच्या समोरील अभिलेखावरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, इंडियन एक्सप्रेसच्या दिनांक ८ आणि ९ जानेवारी, १९७९ च्या प्रतींमध्ये ज्यांच्या नावांचा उल्लेख केलेला आढळतो, अशा मोठ्या संख्येने असलेल्या व्यक्तींना खटला सुद्धा सुरू न करता, वर्षानुवर्षे तुरुंगवासात ठेवण्यात आले आहे. बिहार राज्य शासनाला जरी त्यांच्यावर केलेल्या आरोपांची पूर्तता करण्यास पुरेशी संधी देण्यात आली असली तरीही राज्य शासनाच्या वतीने कोणीही उपस्थित राहिले नाही ही दुर्दैवाची बाब आहे. हेबियस कॉर्पस याचिकेवरील उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचे महत्त्व लक्षात घेऊन आम्ही राज्य शासनाला उपस्थित राहण्याची आणखी संधी दिली आहे आणि प्रस्तुत याचिका अंतिम सुनावणीसाठी १९ फेब्रुवारी, १९७९ रोजी तहकूब केली आहे. परंतु, त्याचवेळी सदरच्या न्यायाधीन बंद्यांना अंतरिम दिलासा नाकारण्यासाठी आम्हाला कोणतेही कारण दिसत नाही. प्रत्येक न्यायाधीन बंद्यांच्या बाबतीत काय म्हणणे मांडले गेले आहे याचा काळजीपूर्वक विचार केल्यानंतर, आम्हाला न्यायाच्या हितासाठी दिनांक ५ फेब्रुवारी, १९७९ रोजीचा आदेश पारित करणे योग्य वाटले आहे ज्यायोगे, सदर आदेशामध्ये नमूद केलेल्या व्यक्तींना त्यांनी वैयक्तिक जातमुचलका निष्पादित केल्यानंतर त्यांना सोडण्याचे निर्देश दिले आहेत. सदरचा आदेश, नेहमीच्या आदेशापेक्षा काहीसा निराळा आहे कारण त्याद्वारे निर्देश देण्यात येतो की सदर प्रत्येक प्रकरणात घेतला जाणारा वैयक्तिक जातमुचलका आर्थिक दायित्वावर आधारित नसावा. सदरची अट प्रकरणांमधील विशिष्ट तथ्ये आणि परिस्थितीच्या खात्री पटविणाऱ्या दबावाखाली अपवादात्मक उपाय म्हणून समाविष्ट करण्यात आली आहे.

८.	खटल्याच्या प्रतीक्षेत असलेल्या कैद्याला जामिनावर किंवा त्याच्या उपस्थितीसाठी जामीनदाराशिवाय वैयक्तिक जातमुचलका निष्पादित करून घेऊन सोडण्याच्या न्यायिक अधिकारांच्या वापराबाबत मला हे थोडक्यात सांगावयाचे आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या विद्यमान तरतुदींमध्ये यासंदर्भातील विस्तृत अधिकार आहेत आणि त्यांचा वापर करतांना न्यायालयांनी त्यांच्या स्वेच्छानिर्णयाच्या बाबतचे त्यांचे अधिकार त्या अधिकारांचे स्वरूप आणि आवाका याबाबत स्वतःला अवगत करणे आवश्यक आहे. मला असं वाटतं की अधिकाराचा यांत्रिकपणे वापर करणे चालवून घेणे आता शक्य नाही. आरोपीच्या उपस्थितीसाठी किती रकमेच्या जातमुचलक्याची आवश्यकता आहे किंवा सदर जातमुचलक्यात नमूद केलेले आर्थिक दायित्व किती रकमेचे असावे यासाठी अनेक घटकांचा काळजीपूर्वक विचार करणे गरजेचे आहे. याचा संपूर्ण उद्देश न्यायाधीन बंदी पळून जाणार नाही किंवा ते स्वतःला न्याय चौकशीपासून लपणार नाही हा आहे आणि यासंबंधीत बाबी सदर प्रश्नाचे निरसन करताना विचारार्थ घेतल्या पाहिजेत. कोणत्या बाबी विचारार्थ घेतल्या पाहिजेत यासाठी युनायटेड बेल रिफॉर्म ऍक्ट, १९६६ च्या खाली नमूद तरतुदींमधून एक संक्षिप्त मतितार्थ काढला जाऊ शकतो.

> सुटकेसाठी लादलेल्या कोणत्या अटींमुळे उपस्थितीची संयुक्तिकपणे खात्री मिळेल याची सुनिश्चिती करताना, न्यायिक अधिकारी, त्यांच्यासमोर असलेल्या गुन्ह्यामध्ये लादण्यात आलेल्या आरोपाचे स्वरूप आणि परिस्थिती, आरोपीविरुद्ध उपलब्ध पुराव्याचे महत्त्व, आरोपीचे त्याच्या कुटुंबाशी असलेले नातेसंबंध, त्याचा रोजगार, आर्थिक उत्पन्नाची साधने, चारित्र्य आणि मनस्थिती, त्याचे समाजातील वास्तव्य, त्याचे दोषसिद्धीबाबतचे अभिलेख आणि त्याचे न्यायालयातील सुनावणी

> दरम्यान उपस्थितीबाबतचे किंवा अभियोग टाळण्यासाठीच्या प्रयत्नांचे किंवा न्यायालयातील सुनावणी दरम्यानच्या अनुपस्थितीबाबतचे अभिलेख, याबाबतची उपलब्ध माहिती विचारार्थ घेतील. १८ यू. एस ३१४६ (बी).

सुरक्षिततेच्या हमीसाठी किंवा आर्थिक दायित्वासाठी रक्कम सुनिश्चित करताना वरील बाबी विचारार्थ घेतल्या पाहिजेत. कदाचित, असे केल्यास भारतातील न्यायचौकशीपूर्व सुटकेच्या बाबतीतील प्रचलित प्रणालीचा आनुषंगिक दुरुपयोग टाळता येईल किंवा कोणत्याही परिस्थितीत, तो कमी होऊ शकतो. पहा मोतीराम विरुद्ध मध्यप्रदेश राज्य, मनु/ एस. सी/ ०१३२/ १९७८ : १९७८ क्रि. एल. जे. १७०३.

९. मी स्वतःला, अनुच्छेद २१ च्या उल्लंघनाच्या कारणास्तव किंवा इतर कोणत्याही कारणास्तव, न्यायाधीन बंद्यांच्या सततच्या स्थानबद्धतेची वैधता आणि औचित्यावर कोणतीही अंतिम टिप्पणी किंवा निरीक्षण नोंदवण्यापासून, परावृत्त करणे इष्ट समजतो. म्हणून मला वाटते की, आपण हेबियस कॉर्पस याचिकेतील अंतिम निर्णयाची प्रतीक्षा करावी.

१०. दिनांक ५ फेब्रुवारी, १९७९ चा आदेश जारी करण्यासाठी माझ्यावर प्रभाव टाकणारी ही वरील कारणे आहेत.

११. समारोप करताना, फौजदारी प्रक्रिया संहिते मधील सुस्पष्ट अशा तरतुदीच्या अभावाकडे लक्ष वेधणे इष्ट वाटते ज्यायोगे योग्य प्रकरणांमध्ये न्यायाधीन बंदयांची जातमुचलक्यावर जामीनदारांशिवाय आणि कोणत्याही आर्थिक दायित्वाशिवाय सुटका करणे शक्य होईल. एका सुस्पष्ट तरतुदीची येथे तातडीने आवश्यकता आहे. निर्विवादपणे, आजवर भारतीय तुरुंगामध्ये डांबलेल्या हजारो न्यायाधीन कैद्यांमध्ये अशा अनेक कैद्यांचा समावेश आहे ज्यांना त्यांच्या न्यायचौकशी दरम्यान उपस्थित राहण्याच्या हमीसाठी पुरेशी आर्थिक हमी देण्याचा असमर्थतेमुळे त्यांच्या न्यायचौकशीपूर्व सुटकेची

सुनिश्चिती करणे अशक्य आहे. त्यांच्या सततच्या तुरुंगवासाचे एकमेव कारण हे असताना, मत्सरजनक भेदभावाबाबत तक्रार करण्यासाठी दुसरे चांगले कारण असू शकते आणि त्याहूनही अधिक, ते अशा घटनात्मक व्यवस्थेच्या अंतर्गत जी सर्व नागरिकांना सामाजिक समानता आणि सामाजिक न्यायाचे वचन देते. केवळ आर्थिक गरिबीच्या कारणास्तव स्वातंत्र्यापासून वंचित राहणे हा घटनात्मक उद्दिष्टे साध्य करण्याची आकांक्षा असलेला समाजातील एक विसंगत घटक आहे. उपस्थितीच्या हमीसाठी विचारार्थ घेण्याच्या पुरेशा इतर हमी आहेत ज्याचा उल्लेख याअगोदर करण्यात आला आहे आणि मला असे वाटते की, जर संविधीमध्ये आर्थिक दायित्वाशिवायच्या सुटकेबाबत योग्य ती तरतूद केली गेली तर आपले कायदे - निर्माते वैयक्तिक स्वातंत्र्याबाबत महत्त्वाची पावले उचलतील.

(दिनांक २६ फेब्रुवारी , १९७९ , न्यायमूर्ती पी. एन. भगवती आणि ए. पी. सेन, ३१) :

१२. बिहार राज्य शासनाने आम्ही आमच्या दिनांक १९ फेब्रुवारी, १९७९ च्या आदेशात नमूद केलेल्या सूचनेनुसार, शासकीय आदेशाच्या परिच्छेद २ (ई) चे प्रस्तावित स्पष्टीकरण असलेली एक टिप्पणी सादर केली आहे. या स्पष्टीकरणाच्या परिच्छेद एक मध्ये असे नमूद केले आहे की, एखाद्या प्रकरणातील पोलीस तपासात दोन वर्षांहून अधिक काळ विलंब झाल्यास, पोलीस अधीक्षक, तपास जलदगतीने पूर्ण होईल आणि पोलीस अंतिम अहवाल किंवा दोषारोपपत्र लवकरात लवकर सादर करतील याकडे लक्ष देतील आणि याची खात्री करण्याची जबाबदारी व्यक्तीशः पोलीस अधीक्षकांवर टाकण्यात आली आहे. राज्य सरकारने आमच्या सूचनेला प्रतिसाद दिला आहे हे लक्षात घेऊन आम्हाला आनंद होत आहे. परंतु, केवळ, तपास जलदगतीने पूर्ण होईल आणि अंतिम अहवाल किंवा दोषारोपपत्र लवकरात लवकर सादर होईल, याची तरतूद करणे पुरेसे आहे की नाही याची आम्हाला अजिबात खात्री नाही. आमच्या मते, राज्य

शासनाने एक वाजवी कालमर्यादा निश्चित केली पाहिजे, ज्यामध्ये ही पावले उचलली जावीत जेणेकरून, अंतिम अहवाल किंवा दोषारोपपत्र सादर करण्यात आणखी विलंब होणार नाही. कोणत्याही पोलीस तपासात दोन वर्षांएवढा विलंब कसा लागू शकतो हे पाहण्यात आम्ही अपयशी ठरलो आहोत आणि जर पोलीस तपास दोन वर्षांत पूर्ण होऊ शकत नसेल तर बिहार राज्यातील पोलीस दलात काहीतरी मूलतः गडबड असावी. असे दिसते की, अशी अनेक प्रकरणे आहेत त्यांमध्ये पोलीस तपास दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधीनंतरही पूर्ण झालेला नाही आणि आरोपी व्यक्ती वर्षानुवर्षे न्यायाधीन बंदी म्हणून तुरुंगात आहेत. कायदा आणि सुव्यवस्थेचा विचार करता आतापर्यंतची ही धक्कादायक परिस्थिती आहे आणि म्हणून आम्ही असे सुचवू की, ज्या प्रकरणांमध्ये पोलिसांच्या तपासास दोन वर्षांपेक्षा जास्त विलंब झाला आहे, त्या प्रकरणांमध्ये पोलिसांनी अंतिम अहवाल किंवा आरोपपत्र पुढील तीन महिन्यांच्या कालावधीत सादर केले पाहिजे आणि तसे न झाल्यास, राज्य शासन सदरचे खटले मागे घेईल कारण दोन वर्षांहूनही अधिक कालावधी आणि तीन महिन्यांच्या अतिरिक्त कालावधीनंतरही, जर पोलीस आरोपपत्र दाखल करू शकत नसतील तर कोणीही हे संयुक्तिकपणे समजू शकेल की अटक केलेल्या व्यक्तीविरुद्ध कोणताही खटला नाही.

१३. बिहार राज्य शासनाने श्री. मृण्मय चौधरी, सहाय्यक कारागृह महानिरीक्षक (१), बिहार यांनी तयार केलेले प्रति-प्रतिज्ञापत्र देखील सादर केले आहे. ज्यामध्ये, त्यांनी आम्ही ज्या १८ न्यायाधीन बंद्यांना त्यांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडण्यासाठी आदेशित केले आहे, त्यांच्या संबंधातील तपशील नमूद केले आहेत. या प्रति-प्रतिज्ञापत्रात दिलेले तपशील वाचणे फारच त्रासदायक आहे. या प्रति-प्रतिज्ञापत्रावरून असे दिसून येते की, अशा काही महिला कैदी ज्यांनी कोणताही गुन्हा केला नसतांना केवळ त्या गुन्ह्याला बळी पडल्या म्हणून किंवा त्या साक्ष देण्यासाठी आवश्यक आहेत म्हणून तुरुंगात आहेत किंवा संरक्षणात्मक कोठडीत आहेत. संरक्षणात्मक कोठडी हा शब्दप्रयोग अप्रिय गोष्टीसाठी योजलेला सौम्य शब्दप्रयोग आहे आणि प्रत्यक्षात ते

तुरुंगवासाशिवाय दुसरे काहीही नाही. हा एक शब्दप्रयोग आहे ज्याचा हेतू सदसदविवेकबुद्धीला शांत करणे हा आहे. ज्या महिलांना संरक्षणात्मक कोठडींच्या नावाखाली तुरुंगात ठेवण्यात आले आहे त्यांना त्यांच्या बाजूने कोणतीही चूक नसताना जबरदस्तीने दीर्घकाळ स्वातंत्र्यापासून वंचित रहावे लागले आहे. आम्ही असे निदर्शनास आणू इच्छितो की, ही बाब घटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत हमी दिलेल्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या उघड उल्लंघनापेक्षा कमी नाही कारण आम्हाला कायद्याच्या अशा कोणत्याही तरतुदीची माहिती नाही ज्याअंतर्गत संरक्षणात्मक कोठडी म्हणून किंवा साक्ष देण्यासाठी तिची आवश्यकता आहे म्हणून एखाद्या महिलेला तुरुंगात ठेवले जाऊ शकते. समाजकल्याण राज्यातील राज्य सरकारने अशा स्त्रिया व मुले, ज्यांना कुठेही इतरत्र आसरा नाही आणि ज्यांची समाजाने काळजी घेतली नाही, यांची काळजी घेण्यासाठी बचाव आणि कल्याणगृहे स्थापन करणे आवश्यक आहे. बेघर किंवा निराधार असलेल्या स्त्रिया आणि मुले यांचे संरक्षण करणे हे सरकारचे कर्तव्य आहे आणि हे आश्चर्यकारक आहे की, बिहार राज्य शासनाने असे स्पष्टीकरण घेऊन पुढे यायला हवे होते की, त्यांना, महिलांना तुरुंगात 'संरक्षणात्मक कोठडीत' ठेवण्यास भाग पाडले गेले, कारण, सरकारने सुरू केलेले कल्याणगृह बंद होते. म्हणून आम्ही असे निर्देश देतो की, बिहार राज्यातील तुरुंगात 'संरक्षणात्मक कोठडीत' असलेल्या किंवा ज्यांची उपस्थिती प्रकरणात साक्ष देण्यासाठी आवश्यक आहे किंवा ज्या गुन्ह्यातील बळी आहेत, अशा सर्व स्त्रियांना सोडण्यात यावे आणि त्यांना ताबडतोब कल्याणगृहे व बचावगृहे यात नेले जावे, त्यांना तेथे ठेवले जावे व त्यांची योग्य काळजी घेतली जावी.

१४. आम्हाला प्रति-प्रतिज्ञापत्रावरून असेही आढळून आले की, भोला महतो ही व्यक्ती दिनांक २३ नोव्हेंबर, १९६८ पासून ज्या दिवशी त्याला आम्ही आमच्या दिनांक ५ फेब्रुवारी, १९७९ च्या आदेशात दिलेल्या निर्देशांनुसार, त्याच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडले गेले, त्या दिवसापर्यंत म्हणजेच दिनांक १६ फेब्रुवारी, १९७९ पर्यंत कारागृहात होता. तो भारतीय दंड विधानाच्या कलम ३६३ आणि ३६८ अंतर्गत

एका खटल्यात आरोपी आहे आणि त्याचा खटला दिनांक १३ सप्टेंबर, १९७२ रोजी सत्र न्यायालयात वर्ग झाला होता. परंतु, त्या प्रकरणात सत्र न्यायालयात न्यायचौकशी सुरू झाली नव्हती. पूर्वीच म्हणजेच १३ सप्टेंबर, १९७२ रोजी खटला सत्र न्यायालयात वर्ग होऊनही त्या प्रकरणात सत्र न्यायालयात न्यायचौकशी सुरूही झाली नव्हती हे आश्चर्यकारक आहे. म्हणून, आम्ही असे निर्देश देतो की, सत्र न्यायाधीश, पाटणा यांनी आजपर्यंत भोला महतो याच्या प्रकरणी सत्र न्यायालयात न्यायचौकशी का सुरू झाली नाही, याचे स्पष्टीकरण पाटणा उच्च न्यायालयामार्फत प्रस्तुत न्यायालयास अग्रेषित करावे. याकडेही आम्ही पाटणा उच्च न्यायालयाचे लक्ष देणार आहोत. २८ मार्च १९७१ रोजी तुरुंगात दाखल झालेल्या राम सागर मिस्त्री, ज्याच्यावर भारतीय दंड संहितेच्या कलम ३९५ अंतर्गत आरोप ठेवण्यात आला होता आणि ज्याचा खटला सत्र न्यायालयाकडे दिनांक २८ जून १९७२ रोजी वर्ग करण्यात आला होता परंतु त्याचा खटला सत्र न्यायालयात वर्ग होऊन सहा वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्यानंतरही आणि त्याला तुरुंगात डांबल्यापासून आठ वर्षांचा कालावधी उलटून सुद्धा त्याच्या खटल्यामध्ये अद्याप पर्यंत न्याय चौकशी सुरू झाली नव्हती, त्याच्याबाबतही असेच म्हणता येईल.

१५. प्रति-प्रतिज्ञापत्रात असे दिसून आले आहे की बबलू राय जो नक्षलवादी आहे असे दाखविले आहे, तो दिनांक १५ मे १९७५ पासून कारागृहात आहे. त्याच्यावर पाच खटल्यांमध्ये सामील असल्याचा आरोप आहे आणि सदरच्या खटल्यांचा उल्लेख प्रतिप्रतिज्ञापत्रात केलेला आहे. जोपर्यंत त्याचा संबंध आहे तोपर्यंत हे त्याच्यासाठी, ज्या न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर त्याला हजर केले जाईल त्यांच्याकडे त्याने त्याला जामीनावर किंवा वैयक्तिक जात उचलक्यावर सोडण्यासाठी अर्ज करणे, हे खुले आहे आणि त्यानंतर आणि त्यानंतर सदर दंडा सदर न्यायदंडाधिकारी, आम्ही आमच्या दिनांक १२ फेब्रुवारी १९७९ रोजी च्या न्यायनिर्णयात नमूद केलेल्या व्यापक मार्गदर्शक तत्त्वानुसार त्याच्या अर्जावर कार्यवाही करतील.

१६. प्रति-प्रतिज्ञापत्राचे वाचन केल्यावर आम्हाला या बाबीची खात्री वाटत नाही की ज्या न्यायचौकशीअधीन कैद्यांचे तपशील त्यात दिले आहेत त्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १६७ (२) च्या परंतुकात आवश्यक असल्याप्रमाणे न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर ठराविक कालावधीनंतर हजर केले जाते का? कलम १६७ (२) परंतुकाचे पालन करण्यासाठी या कच्च्या कैद्यांना ठराविक कालावधीनंतर न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले होते का? ही बाब आम्ही शासनाकडून आमच्यासमोर दिनांक ३ मार्च १९७९ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल करण्यात येणाऱ्या योग्य प्रतिज्ञापत्रामधून जाणून घेऊ इच्छितो. कलम १६७ (२) च्या परंतुकानुसार जर आरोपी व्यक्तीला पंधरा दिवसांच्या मुदतीपेक्षा अधिक काळ स्थानबद्ध करून ठेवण्यास पुरेशी आधार कारणे अस्तित्वात आहेत अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर त्यांना तसे करता येईल. जरी पोलीस तपासासाठी दोन ते दहा वर्षे इतक्या मोठ्या कालावधीसाठी या व्यक्तींना न्यायिक कोठडीत स्थानबद्ध करण्यासाठी आधार कारणे अस्तित्वात असल्याची न्यायदंडाधिकाऱ्यांनी स्वतःची खात्री करणे कसे शक्य आहे हे जरी आम्ही समजू शकत नाही तरीही आम्ही अशी आशा करतो आणि असा विश्वास ठेवतो की या प्रकरणात संबंधित न्यायदंडाधिकाऱ्यांनी यांत्रिकपणे कृती न करता विचार केला आणि दोन ते दहा वर्षांच्या कालावधीमध्ये या व्यक्तींना वेळोवेळी न्यायिक कोठडीत स्थानबद्ध करण्यासाठी पुरेशी आधार कारणे अस्तित्वात असल्याची स्वतःची खात्री केली. सखोल चौकशी केल्यानंतर पाटणा उच्च न्यायालयाने या बाबीचा विचार करावा असे आम्हाला वाटते.

१७. दिनांक १ फेब्रुवारी १९७९ रोजी १८ महिन्यांहून अधिक काळासाठी बिहार मधील तुरुंगात स्थानबद्ध केलेल्या १७ कच्च्या कैद्यांचे तपशील दर्शविणारी यादी बिहार राज्य शासनाने आमच्या समोर दाखल केली. ही यादी असे दर्शविते की या तुरुंगात कच्चे कैदी बऱ्याच मोठ्या काळासाठी आणि काही वेळेस तर त्यांच्या विरुद्ध केलेल्या आरोपांमध्ये ते जरी दोषी आढळले तरी त्यांना ठोठावण्यात येणाऱ्या सर्वाधिक शिक्षेच्या कालावधी

पेक्षाही जास्त कालावधीसाठी स्थानबद्ध आहेत. उदाहरणादाखल सांगायचे तर, बाब क्रमांक ३० वरील एक इसम नामें लंबोदर गोरेन हा शस्त्र अधिनियमाच्या कलम २५ अन्वये केलेल्या गुन्ह्यासाठी, ज्याकरिता सर्वाधिक शिक्षा दोन वर्षांची आहे त्या गुन्ह्याकरिता करिता, दिनांक १८ जून १९७० पासून रांची तुरुंगात आहे. परिणामी तो ज्या गुन्ह्यासाठी तुरुंगात आहे त्याकरिता शिक्षा झाल्यास त्याला दोन वर्षांहून अधिक शिक्षा ठोठावण्यात येऊ शकत नाही अशा गुन्ह्यासाठी तो आठ वर्षानंतरही कच्चा कैदी म्हणून तुरुंगात आहे. यादीमध्ये अशी अनेक प्रकरणे आहेत पण यादीवरून ती सहजपणे ओळखणे शक्य नाही. कारण यादीमध्ये मोठ्या प्रमाणात कच्च्या कैद्यांची नावे आहेत. म्हणून आम्ही बिहार राज्यशासनास असे निर्देश देतो की किरकोळ गुन्हे आणि इतर म्हणजेच मुख्य (गंभीर) गुन्हे अशा दोन प्रकारात ढोबळपणे विभागणी करून या तुरुंगामध्ये असणाऱ्या कच्च्या कैद्यांचे वर्षनिहाय विभागणी असलेल्या तपशीलांची सुधारित यादी दिनांक ३ मार्च १९७९ रोजी किंवा त्यापूर्वी आमच्याकडे सादर करावी.

१८. आमचे लक्ष फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम ४६८ कडे सुद्धा वेधण्यात आले आहे, ज्यातील पोट कलम (१) मध्ये अशी तरतूद आहे की संहितेत अन्यथा उपबंधित केलेले असेल तेवढे खेरीज करून एरवी कोणतेही न्यायालय मुदत मर्यादा संपल्यानंतर पोट कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रवर्गातील अपराधाची दखल घेणार नाही आणि पोट कलम (२) नुसार जर अपराध द्रव्यदंडाच्या शिक्षेला पात्र असल्यास मुदत मर्यादा सहा महिने; अपराध जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास मुदत मर्यादा एक वर्ष आणि अपराध एक वर्षाहून अधिक पण जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र असल्यास मुदत मर्यादा तीन वर्षे इतकी आहे. म्हणून असे दिसून येते की कलम ४६८ च्या पोट कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या मुदत मर्यादेच्या कालावधीत ज्या कच्च्या कैद्यांविरुद्ध आठ पोलिसांनी आरोप पत्र दाखल केले नाही त्यांच्या विरुद्ध अजिबात कार्यवाही करता येऊ शकत नाही आणि ते ताबडतोब सुटका होण्यासाठी पात्र आहेत

कारण त्यांना पुढील कालावधीसाठी स्थानबद्ध करणे बेकायदेशीर असेल आणि अनुच्छेद २१ अन्वये मूलभूत हक्कांचे उल्लंघन ठरेल, म्हणून आम्ही बिहार राज्य शासनास असे निर्देश देतो की ज्या कच्च्या कैद्यांचे अपराध द्रव्यदंडाच्याच शिक्षेला पात्र आहेत किंवा अपराध जास्तीत जास्त एक वर्ष इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र आहेत किंवा अपराध एक वर्षाहून अधिक पण जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेला पात्र आहेत अशा कच्च्या कैद्यांच्या प्रकरणांची छाननी करावी आणि त्यांच्यापैकी मुदत मर्यादा संपल्याच्या कारणास्तव ज्यांच्यावर कार्यवाही करता येणार नाही अशांची मुक्तता करावी. आज पासून सहा आठवड्यांच्या आत बिहार राज्य शासनाने या निर्देशांचे पालन करावे आणि तपशील समाविष्ट असलेले पूर्तता अहवाल या न्यायालयास सुरुवातीस चार आठवड्यांच्या अखेरीस आणि नंतर पुढील दोन आठवड्यांच्या अखेरीस सादर करावे.

१९. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १६७ (५) वरून आम्हास असे आढळते की न्यायदंडाधिकारी याला समन्स खटला म्हणून संपरिक्षा करता येण्याजोग्या अशा कोणत्याही प्रकरणी जर आरोपीला अटक केल्याच्या दिवसापासून सहा महिन्यांच्या कालावधीत अन्वेषण संपले नाही तर न्यायदंडाधिकारी अपराधाचे त्यापुढील अन्वेषण थांबवण्याचा आदेश देईल. मात्र विशेष कारणास्तव आणि न्याय हितार्थ सहा महिन्यांच्या कालावधी पलीकडे अन्वेषण चालू ठेवणे जरुरीचे आहे अशी अन्वेषण करणाऱ्या अधिकाऱ्याने न्यायदंडाधिकाऱ्याची खात्री पटवली तर गोष्ट वेगळी. या तरतुदीचे पालन करण्यात आलेले आहे याबाबत आम्हास अजिबात खात्री वाटत नाही कारण अशी बरीच प्रकरणे आहेत की ज्यामध्ये कच्च्या कैद्यांच्या अपराधाची प्रकरणे समन्स खटला म्हणून संपरीक्षा करता येण्याजोगी आहेत. म्हणून आम्ही बिहार राज्य शासनास असे निर्देश देतो की या प्रकरणांची चौकशी करावी आणि जेथे विशेष कारणास्तव व न्यायहितार्थ सहा महिन्यांच्या कालावधी पलीकडे अन्वेषण चालू ठेवणे जरुरी आहे अशी न्यायदंडाधिकाऱ्यांची खात्री न पटवता, अन्वेषण ६ महिन्यांपेक्षा

अधिक काळ सुरू आहे असे आढळले त्याप्रकरणी आजपासून एक महिन्याच्या कालावधीत न्यायदंडाधिकाऱ्याकडून आवश्यक आदेश प्राप्त न केल्यास बिहार राज्य शासनाने कच्च्या कैद्यांची सुटका करावी. उच्च न्यायालयाने या प्रकरणी लक्ष घालावे आणि बिहार मधील न्यायदंडाधिकारी कलम १६७ (५) च्या तरतुदींचे पालन करत आहेत की नाही याची खात्री करावी अशी सुद्धा आम्ही विनंती करतो.

२०. रिट याचिकेवरील सुनावणी आम्ही दिनांक ५ मार्च १९७९ रोजी तहकूब करतो आणि त्या दिवशी निश्चित करण्यासाठी उद्भवलेल्या विविध प्रश्नांवर गुणवत्तेवर सुनावणी घेऊन रिट याचिका निकाली काढण्याची कार्यवाही करू.

कॉपीराईट - मनूपात्रा इन्फॉर्मेशन सोल्युशन्स प्रा. लि.

x-x-x-x

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x